## प्रश्नोत्तरे ५४-५५

## तर्क आणि प्रेम

ॐ श्री साईराम

प्रश्नोत्तरांच्या सत्रामध्ये तुमचे स्वागत असो! आमच्याकडे आज आलेला प्रश्न असा आहे की धर्म तर्कशुद्ध आहे का तर्कशुन्य आहे? बुद्धीला पटणारा आहे का न पटणारा आहे! हा प्रश्न एका तरुण मनुष्याकडून आला आहे. तो धर्माकडे तर्कदृष्टीने पाहू शकत नाही म्हणून धर्म तर्कशुद्ध आहे का नाही हे त्याला जाणून घ्यायचे आहे आणि ते साहजिक आहे कारण तो तर्क तर्कशास्त्र आणि बुद्धीप्रामाण्यवादाच्या पलीकडे आहे. परंतु, हे अत्यंत स्वाभाविक आहे की जर आम्ही त्या तरुणाला धर्माचे अनुसरण करण्यास सांगितले तर तो हा प्रश्न विचारेल की तो तर्कशुद्ध आहे का? बुद्धीला पटणार आहे का? आता आपण ह्या प्रश्नाचं उत्तर पाहूया.

ह्या जगामध्ये सर्वच गोष्टी तर्कशुद्ध नसतात. सर्व गोष्टींचे तंत्र व तंत्रज्ञानाच्या आधारे स्पष्टीकरण देता येत नाही. विज्ञानाद्वारेही ते कधी कधी शक्य नसते. उदा. तुमची श्रद्धा. त्या पाठीमागचा तर्क स्पष्ट करा. मी प्रेम करतो ह्याच्या पाठीमागे काय तर्क असू शकतो? म्हणून तर्क हा भौतिक गोष्टींसाठी असतो, सांसारिक गोष्टींसाठी असतो, ऐहिक बाबींसाठी असतो, परंतु इतर अनेक गोष्टी अशा आहेत ज्या आपल्या तर्काच्या आणि बुद्धीच्याही पलीकडे आहेत. एखादी व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीच्या प्रेमात का पडते हे मी तार्किकदृष्ट्या स्पष्ट करू शकत नाही. तसेच एखाद्याच्या अंतरंगातून त्यागभाव का निर्माण होतो हे मी सांगू शकत नाही. ह्याच्यामागे कोणताही तर्क नाही. ह्यावरून हे स्पष्ट होते की तर्काच्या पलीकडेही गोष्टी आहेत. विज्ञान आणि तंत्रज्ञानात काल आणि स्थान ह्यांची मर्यादा आहे. मातेच्या प्रेमाकडे पाहा. तिचा मुलगा दूरवर असला तरीही ते कसं भरभरून वाहत असते. प्रेमीजन जर एकमेकांपासून दूर असले तरी ते एकमेकांचा विचार करत असतात. प्रेमाला स्थळकाळाच्या मर्यादा नाहीत. तसेच शांतीलाही स्थळकाळाच्या मर्यादा नाहीत. त्यामागे कोणताही तर्क नाही. म्हणून प्रत्येक गोष्टीचे तार्किकदृष्ट्या स्पष्टीकरण देणे शक्य नाही. कारण प्रेम गूढ आहे, अगम्य आहे, अद्‌भूत आहे. प्रेम म्हणजे मूर्तिमंत चमत्कार! परमेश्वर हेच प्रेम आणि प्रेम हाच परमेश्वर. प्रेमामध्ये जीवन जगा. परमेश्वर म्हणजे प्रेम आणि प्रेम हाच परमेश्वर ह्याचा बोध होणे म्हणजेच धर्म. जर तुम्ही जीवनातील प्रत्येक गोष्टीसाठी तर्काचा आधार घेतलात तर लवकरच तुमच्या लक्षात येईल की तर्क विनाशकारी आहे. तर्क सर्जनशील नाहीये. तर्कामधून कोणतीही निर्मिती होऊ शकत नाही. त्यामध्ये निर्मितीक्षमता नाही आणि अजून पुढे जाऊन सांगायचे तर तर्क तुमच्या श्रद्धेचे समूळ उच्चाटन कसे होईल, तुमच्यामधील प्रेम कसे पूर्णत: नष्ट होईल हेही पाहतो. अशा प्रकारे तर्क विषासमान कार्य करतो, मित्रांनो हे तुम्ही लक्षात घ्या आणि वास्तविक जर तुम्ही प्रेमाचा विचार केलात तर तुमच्या लक्षात येईल हे प्रेमच तुमच्या कुटुंबाला बांधून ठेवते. अशी कोणती गोष्ट आहे जी वडिलांना त्याच्याकडे असलेल्या वेळाचा त्याग करण्यास, अथक परिश्रम करण्यास आणि त्यांनी जीवनात अर्जित केलेले सर्वकाही कुटुंबासमवेत वाटून घेण्यास प्रवृत्त करते, तर ते आहे, मुलांप्रती, कुटुंबाप्रती त्यांना वाटणारे प्रेम! असे काय आहे ज्यासाठी आई-मुलांकरता मृत्युलाही सामोरी जायला तयार असते? केवळ प्रेमापोटी! जर आपण झाडाला विचारले की तू फुले का देतोस? ह्याचे तर्काच्या आधारे काही स्पष्टीकरण देता येईल का? शक्यच नाही! मला एखादे गाणे गावेसे वा गुणगुणावेसे का वाटते? प्रत्यक्ष नाही तर, किमान मनातल्या मनात तरी मला नृत्य करावेसे का वाटते? तर्क ह्याचे स्पष्टीकरण देऊ शकतो? नाही. मला रोज आनंद होतो मी दिवसभर आनंदात असतो. हा आनंद, हा हर्षोल्हास, ही प्रसन्नता, दिव्य आनंद, अत्यानंद, आपण दिवसभर एक उत्सव,

आनंदाचा उत्सव साजरा करतो. ह्याचे तार्किकदृष्ट्या मी कसे स्पष्टीकरण देऊ? शक्यच नाहीये ते. जे लोक खरोखरच भौतिकवादी आणि स्वार्थी असतात त्यांच्यामध्ये प्रेमाचा अभाव असू शकतो. अशा लोकांना प्रेम करणे वा प्रेम संपादन करणे अशक्य असते. त्यांना त्यांच्या आत्म्याचे विस्मरण झालेले असते. जेव्हा मी प्रेमाशिवाय आपल्या जीवनाचा विचार करतो. तेव्हा ते जीवन अर्थशून्य, नीरस, बेचव आणि कंटाळवाणे भासते. प्रेम हाच आपला आत्मा आहे, जे जीवनाचे गूढ आहे. प्रेम आपल्याला आनंद देते आणि तेच आपल्याला परमेश्वराचे चिंतन करण्यास, त्याचा शोध घेण्यास व त्याच्याविषयी अधिक जाणून घेण्यास प्रवृत्त करते आणि त्याच प्रेमामध्ये, प्रेमाचा विस्तार करण्याची, प्रेमाची कक्षा रुंदावण्याची क्षमता असते. प्रेमाचा विस्तार म्हणजे जीवन आणि प्रेमाचे आकुंचन म्हणजे मृत्यू असे भगवान म्हणतात. प्रेमामुळे अनेक गोष्टी घडू शकतात. मी विज्ञानाच्या पलीकडे आहे हे मी जाणून घेतले पाहिजे. सर्व वैज्ञानिक अन्वेषण व शोध मनुष्यानेच लावले आहेत. मनुष्य त्याच्या ज्ञानाहून श्रेष्ठ आहे. मनुष्य त्याच्या वैज्ञानिक, अन्वेषणाहून श्रेष्ठ आहे. मनुष्याला जे ज्ञान संपादन करायचे आहे तसेच त्याने जी माहिती गोळा केली आहे त्याहून तो अधिक श्रेष्ठ आहे. तो विज्ञान, तंत्रज्ञान, ज्ञान इ. सर्व गोष्टींहून वरचढ आहे. मनुष्याच्या अंतर्यामी आत्मा, चैतन्य आहे, परमात्मा आहे जो खरोखरच अनाकलनीय आहे. जर तुम्ही तुमच्या अंतर्यामी असलेल्या आत्म्यास जाणून घ्यायचा प्रयत्न केलात तर त्याला तुम्ही जाणू शकणार नाही. कारण तो दुर्बोध आहे. विश्व जड अथवा भौतिक वस्तू तुम्ही जाणू शकता. परंतु आत्मा वा चैतन्य अनाकलनीय आहे. आत्मा वा चैतन्य वर्णनातीत आहे. आपल्या अनाकलनाच्या पलीकडे आहे असे उपनिषदांमध्ये प्रतिपादन केले आहे. हेच त्याचे कारण आहे. ती शक्ती तुम्ही आहात – चैतन्य शक्ती, प्रेम शक्ती, दिव्यशक्ती वास्तविक, तुम्ही दिव्यस्वरूप आहात! मग आता सांगा की तुम्हाला मिळालेल्या माहितीहून तुम्ही संपादन केलेल्या ज्ञानाहून, तुम्ही कार्यरत असलेल्या पदाहून तुम्ही अधिक श्रेष्ठ नाही का? अखेर तुम्ही ह्या सर्वांहून श्रेष्ठ आहात, हे तुम्ही जाणले पाहिजे. तुम्ही आत्मा आहात. मूलतत्त्व आहात जे पूर्णत: अगम्य आहे.

जर जीवनामध्ये प्रेमाचा अभाव असेल तर मला वाटते सर्व व्यर्थ आहे. अशा परिस्थितीत व्यक्तीला आत्महत्या करण्याशिवाय दुसरा पर्याय उरत नाही. काहीजण असं म्हणतात की, जीवनामध्ये कोणतेही विशेष ध्येय नाही, उद्दिष्ट नाही... जीवनामध्ये ध्येयासक्ती असणं ह्यासारखं दुसरं काही नाही. मला ती भावना तथ्यहीन वाटते. का? कारण संगीत, साहित्य, चित्रकला, शिल्पकला, विज्ञान वा अन्य कोणतेही ध्येय, उद्दिष्ट ह्यांच्याशिवाय आपण जीवन का जगू किंवा आपण उद्याचा विचार का करू? आपले जीवन पोषित करण्यासाठी, अन्नग्रहण का करू? रोज रात्री झोपायचे व सकाळी उठायचे हे दैनंदिन जीवन कशासाठी? ध्येय वा उद्दिष्ट जीवन अर्थपूर्ण बनवते, का? प्रेम हा जीवनाचा अधारस्तंभ आहे. सर्वसाधारणपणे जीवन हेच प्रेम आहे... म्हणून धर्म, तार्किक नाही आहे. धर्म प्रेम आहे. हे आपण जाणले पाहिजे. प्रेम ही एक भावना आहे आणि ती कोणत्याही कारणाच्या पलीकडे आहे. त्या प्रेमाची धडपड त्याची स्पंदनं आपल्या हृदयात असतात, मनात नव्हे. तेथे असलेले सौंदर्य व दृष्टिकोन आपण जाणले पाहिजे. म्हणून हे मित्रा, तुला माझे उत्तर असे आहे की... धर्म तर्कावर आधारित नाही, तर्कशुद्ध नाही... धर्म प्रेम आहे... धर्म प्रेम आहे. धर्म हा विज्ञान, तंत्रज्ञान, तर्क ह्या सर्वांच्या मर्यादांच्या पलीकडे आहे... खूप, खूप धन्यवाद!

आता पुढचा प्रश्न आहे –

आध्यात्मिक जीवनात चमत्कारांची भूमिका काय आहे? चमत्कार कशासाठी? बाबांनी सांगितल्यानुसार त्याचं उत्तर असं आहे की चमत्कार हे ओळखपत्र आहे. आपण आता ते समजून घेऊ या... जर तुम्हाला एखाद्या अधिकाऱ्याला वा कार्यालयातील मोठ्या साहेबांना भेटायचे असेल तर तुम्ही तुमचे ओळखपत्र पाठवता त्यामुळे कोण भेटायला आले आहे हे साहेबांना समजते. एकदा तुमची आणि त्यांची ओळख झाली, परिचय झाला की मग ओळखपत्राची आवश्यकता नसते. जीवनात घडणारे चमत्कार म्हणजे परमेश्वराचा आपल्या जीवनात प्रवेश. परमेश्वर आपल्या जीवनात प्रवेश करून त्याचा परिचय देतो कारण आपणच आपल्या जीवनाचा कर्ता-करविता आहोत, आपले जीवन आपल्यामुळेच चालले आहे असे समजू नकोस. प्रत्येक गोष्ट तुला तुझ्या ताब्यात ठेवणे शक्य आहे असा विचार करू नकोस. नाही! ते अशक्य आहे हे तू जाणून घे. परमेश्वर स्वत:चा परिचय करून देण्यासाठी, तुमच्या जीवनात प्रवेश करतो. चमत्कार हे त्याचे परिचय पत्र आहे. त्यानंतर मात्र चमत्काराची आवश्यकता नसते.

बाबांनी दुसरं एक विधान केलं आहे की, चमत्कार हे डासाएवढे आहेत आणि दिव्यत्व हे महाकाय हत्तीएवढे आहे. हत्तीचा आकार अती प्रचंड आहे तर त्याच्यापुढे डास अगदी क्षुल्लक आकाराचा आहे... आणि आपण त्या दिव्यत्वाला विसरून त्या डासाचा विचार करतो. म्हणून ह्या चमत्कारांना अवास्तव महत्त्व देऊन, अवास्तव मोल प्रदान करून कधी कधी अंधपणे वा डोळसपणे आपल्याला त्या अनाकलनीय दिव्यत्वाचा विसर पडतो. हे सर्व चमत्कार, आपल्याला दिव्यत्व जाणून घेण्यासाठी, त्याचा अनुभव घेण्यासाठी व आपल्याला दिव्यत्वाकडे घेऊन जाण्यासाठी आहेत. हे आपण लक्षात घेतले पाहिजे. चमत्कार हे चमत्कारासाठी नसतात. कला ही कलेसाठी असते का? चमत्कार हा चमत्कारासाठी असतो का... नक्कीच नाही. चमत्कार तुम्हाला जीवनामध्ये दिशा दर्शवतात म्हणून चमत्कारांकडे तुम्ही निर्देशक, मार्गदर्शक म्हणून पाहिले पाहिजे. म्हणजे ज्याद्वारे आपण परमेश्वराशी संपर्क साधू शकू.

आणि तिसरा मुद्दा असा आहे की परमेश्वरासाठी चमत्कार ही अगदी उत्स्फूर्त व स्वाभाविक गोष्ट आहे हे आपण जाणून घ्यायला हवे. परमेश्वर चमत्कार करत नाही तर चमत्कार घडतात. ते केले जात नाहीत, चमत्कार घडतात. जर चमत्कार केला तर तो मानवी असतो. जर चमत्कार घडला तर तो दैवी चमत्कार असतो. कारण तो आध्यात्मिक ज्ञान व आध्यात्मिक जाण ह्यामुळे घडतो. परंतु जर एखाद्या जादूगाराने चमत्कार केला तर त्याला तुम्ही जादू म्हणता म्हणून सर्वसामान्यदृष्ट्या चमत्कार हे नुसते चमत्कार नसतात. शून्यातून घडलेले चमत्कार हे खरे आध्यात्मिक आणि दैवी असतात. जादूगार केवळ त्याच्या उपस्थितीत ते करू शकतो. तो त्याच्या अनुपस्थितीत कोणतीही जादू करू शकत नाही. कारण तो जादू करतो. जादूगाराकडून केली जाते. एखाद्या हजारो मैल दूर राहाणाऱ्या भक्ताला भगवानांनी वाचवल्याचे आपण ऐकतो, ते कसे काय? एखाद्या भक्ताच्या इच्छेखातर आकाशात इंद्रधनुष्य दिसते, ह्याचे तुम्ही कसे स्पष्टीकरण द्याल? समुद्रामध्ये बुडणाऱ्या मनुष्यास बाबांनी वाचवले, ह्याचे तुम्ही काय स्पष्टीकरण द्याल? भगवान सर्वत्र आहेत, त्यांच्या संकल्पाने (इच्छेने) जे जे घडते तो चमत्कार होय.

दिव्यत्वाचा संकल्प हे चमत्काराचे कारण आहे. म्हणून चमत्कार घडतात, केले जात नाहीत आणि चमत्कारातून जो अनुभव मिळतो तो टिकणारा असतो, शेवटच्या श्वासापर्यंत, कायमस्वरूपी टिकणारा असतो. चमत्कारामध्ये संदेश दडलेला असतो. असे अनेक चमत्कार आहेत जे आपल्यामध्ये श्रद्धा उत्पन्न करतात, अनेक लोकांच्या मनात चमत्काराच्या अनुभवामुळे श्रद्धा उत्पन्न होते. अनेक लोक

चमत्कारामुळे त्याग करण्यास सुरुवात करतात. आपल्याजवळ असलेल्या सर्वांचा त्याग करून ते दान देणारे लोक आपण पाहतो... का? त्याचे कारण, त्यांना आलेला दिव्य अनुभव. ज्याला सामान्यजन चमत्कार म्हणतात. स्वार्थी लोकांमध्ये परिवर्तन घडून ते नि:स्वार्थी बनल्याचे आपण पाहतो. हे कसं काय घडतं तर त्यांना आलेला दिव्य अनुभव, ज्याला सामान्य लोक चमत्कार म्हणतात. स्वयंकेंद्रित आणि आळशी मनुष्य जो आयुष्यामध्ये कधीही सुधारणार नाही असे मानले जात होते तो समाजसेवा करण्यास सिद्ध होतो, कसं काय? हे घडतं ते त्याला आलेल्या चमत्काराच्या अनुभवामुळे. मरायला टेकलेल्या मनुष्यास पुनर्जीवन प्राप्त होते हा खरोखरच चमत्कार आहे. ज्याला तुम्ही विज्ञान, तंत्रज्ञान ह्यांच्या निकषांद्वारे स्पष्ट करू शकत नाही. त्याला आपण चमत्कार म्हणतो. परंतु ह्याला मी दिव्यत्वाचा अनुभव म्हणतो आणि त्यामध्ये, मनुष्यामध्ये श्रद्धा, परमेश्वराप्रती भक्ती आणि समस्त मानवजातीविषयी बंधुभाव विकसित व्हावा असा संदेश असतो.

इतरांसाठी त्याग, इतरांची सेवा हे सर्व त्यातून मिळणारे लाभ आहेत. चमत्कारांच्या दिव्य अनुभवांमधून हे सर्व दिव्य संदेश आपल्याला प्राप्त होतात. त्यानंतरची पुढची पायरी ही आहे... तो केवळ एक अनुभव आहे असे म्हणून आपण आपले जीवन मर्यादित करणे योग्य नाही. आपण त्याच्या खोलात जाऊन ते रहस्य शोधून काढले पाहिजे की चमत्कार जे गूढ आहेत, विस्मरयकारक आहेत, जे आपल्या आकलनाच्या आणि स्पष्टीकरणाच्या पलीकडे आहेत त्याचा बोध करून घेण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. चमत्कार वैश्विक आहेत... हो आता फुलाचंच उदाहरण घ्या... कळी उमलून त्याचे फूल बनते, हा चमत्कार नाही का? पाळण्यामधील छोट्या बाळाच्या चेहऱ्यावर हास्य विलसत असते हा चमत्कार नाही का? कोकिळेचे मधुर गायन हा चमत्कार नाही का? ताऱ्यांचे चमकणे हा चमत्कार नाही का? आपल्याजीवनातील प्रत्येक परिस्थिती एक चमत्कार असते म्हणून चमत्कार, एखाद्या वेळी, एखाद्या विशिष्ट घटनेने, विश्वाच्या गूढतेचे निरीक्षण करण्यासाठी तुम्हाला उच्च शिखरावर घेऊन जातो. प्रत्येक गोष्टीस चमत्कार, परमेश्वराचा संकल्प माना. चमत्कारातील चमत्कार मर्यादित आहे व प्रत्येक गोष्टीकडे चमत्कार म्हणून पाहणे ह्याला मर्यादा नाहीत. चमत्कारास स्थल, काळ व परिस्थितीने मर्यादित करणे ही केवळ सुरुवात आहे. त्यामुळे प्रत्येक गोष्ट चमत्कार आहे असे माना. संपूर्ण जीवन अद्‌भूत आहे, एक चमत्कार आहे... म्हणून सीमिताकडून असीमतेकडे, मर्यादेकडून अमर्यादेकडे, मानवी कृतीकडून पलीकडे असणाऱ्या कृतीकडे म्हणजेच दैवी कृतीकडे, चमत्काराकडून संदेशाकडे असा आपला चमत्काराकडे पाहण्याचा दृष्टिकोन असायला हवा. मी माझ्या युवामित्रांना विनंती करतो की चमत्कार आपले साधन वा दुवा बनवून आपली आत्मप्रौढी मिळवण्यासाठी, त्याचा प्रचार व प्रसिद्धीसाठी गैरवाजवी वापर करणे ही खरोखरच शरमेची बाब आहे.

जेव्हा प्रत्येक गोष्टी, अखिल विश्वच एक चमत्कार आहे तेव्हा १० वर्षांपूर्वी आपल्याला आलेल्या अनुभवांविषयी बोलण्यास काय मजा आहे? माझा प्रश्न असा आहे की जर तुम्ही तुमच्या व्यक्तिगत चमत्काराबद्दल बढाई मारत असाल की जणूकाही तो तुमचा एकट्याचा विशेष अधिकार आहे तर माझा तुम्हाला प्रश्न आहे की ह्या चमत्काराने तुमच्यामध्ये काही सुधारणा घडली आहे का? चमत्कारामुळे त्यामध्ये सुधारणा झाली नसेल, तसेच तुमची वृत्ती, स्वभाव ह्यामध्येही जर काही सुधारणा झाली नसेल तर तो चमत्कार कशासाठी? प्रचारासाठी? का सार्वजनिक प्रसिद्धीसाठी? आणि ह्यामुळे अजून एक गोष्ट घडली आहे, परंतु तुम्हाला जसे त्याचे परिणाम प्राप्त झाले. त्यावर तो मनुष्यही असे म्हणेल की माझीही श्रद्धा आहे. माझी श्रद्धा नाही असं तुम्ही कसं म्हणता? तुम्ही तुमची श्रद्धा दाखवू शकता का? त्याप्रमाणे माझी श्रद्धाही मी तुम्हाला दाखवू शकत नाही... म्हणून चमत्काराचे कथन करण्यासाठी आपला बराचसा वेळ देऊन मला नाही

वाटत की आपण सर्वसामान्य लोकांना सारखं तोंड देऊ शकू आणि ह्याशिवाय, आपण त्यामागील संदेशास महत्त्व न देता, आत्मप्रशंसा, आत्मप्रौढी वाढवणाऱ्या चमत्कारास अवाजवी महत्त्व देतो. सध्या हे असंच घडते आहे. जे अत्यंत दुर्दैवी आहे. परंतु, जर तुम्हाला चमत्काराचे स्पष्टीकरण द्यायचे असेल तर तुम्ही तसे करू शकता. तुमच्या जीवनातील चमत्काराविषयी कोणीही तुम्हाला प्रश्न विचारणार नाही वा कोणालाही त्याविषयी शंका असू शकणार नाही. कारण तो चमत्कार तुम्ही अनुभवला आहे, त्याविषयी मला शंका नाही, प्रश्नचिन्ह नाही. परंतु मी म्हणेन की तुम्ही अशा तऱ्हेने त्याचे स्पष्टीकरण द्या की तुमच्या जीवनामध्ये त्याच्यामुळे कसं परिवर्तन घडलं. त्याने तुमच्या जीवनात कसा बदल घडला, एक चांगली व्यक्ती बनण्यास तुम्हाला त्याची कशी मदत झाली, जीवनातील आव्हानांना तुम्ही कसे सामोरे जाऊ शकलात हे चमत्कारामागील चमत्कार. त्यातील संदेशांच्या दृष्टिकोनातून, धर्मग्रंथांच्या सखोल ज्ञानाच्या दृष्टिकोनातून तसेच ह्या चमत्काराच्या अनुभूतीद्वारे आपण ह्या क्षेत्रांमध्ये कसं प्रगल्भ झालो त्याचा बोध हे सर्व ऐकणाऱ्यास माहिती व्हायला हवे. हा चमत्कारामागील दिव्य हेतू आहे. चमत्कार हे खरोखरच गूढ, अनाकलनीय, अद्‌भूत, स्पष्ट करून न सांगता येणारे, विलक्षण असतात जे बंधमुक्त करतात. सदाचरणी व्यक्ती बनण्यासाठी अंतर्मुख बनवून, साधना करण्यास प्रवृत्त करतात. जर आपल्याला हे सर्व करायचे असेल तर आपण चमत्कारांचे स्पष्टीकरण दिले पाहिजे व आपल्या व्यक्तिगत जीवनात काय बदल घडले ह्याचे आपण आत्म परीक्षण केले पाहिजे.

धन्यवाद

ॐ श्री साईराम

ठ ‘